आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र रात्री ८.०० वाजता

२ फेब्रुवारी २०२३ – गुरुवार

**ठळक बातम्या**

- अदानी उद्योग समुहाबाबतच्या अहवालावरच्या चर्चेच्या मागणीवरुन संसदेच्या दोन्ही सभागृहाचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब

- विधान परिषदेच्या कोकण शिक्षक मतदारसंघात भाजपाचे ज्ञानेश्वर म्हात्रे विजयी, नाशिकमध्ये सत्यजित तांबे तर नागपूर, अमरावती आणि औरंगाबादमध्ये महाविकास आघाडीचे उमेदवार आघाडीवर

- शाश्वत जीवनशैलीला व्यापक स्वरूप देण्यासाठी एकत्रितपणे कार्य करण्याचं केंद्रीय आयुष मंत्री सर्बानंद सोनोवाल यांचं जी-२० सदस्य देशांना आवाहन

**आणि**

- दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या मालिकेतल्या अंतिम टी-२० सामन्यात भारतीय महिला संघाकडून ११० धावांचं आव्हान

**<><><><><>**

अदानी उद्योगसमूहाबाबत हिंडेनबर्ग संस्थेने प्रकाशित केलेल्या अहवालावरुन संसदेच्या दोन्ही सभागृहांमधे विरोधकांनी प्रचंड गदारोळ केला. त्यामुळं दोन्ही सभागृहांचं कामकाज सुरुवातीला २ वाजेपर्यंत आणि नंतर संपूर्ण दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

लोकसभेत काँग्रेस, तृणमूल काँग्रेस आणि द्रमुकच्या सदस्यांनी सभागृहाचं कामकाज सुरु होताच याप्रकरणी चौकशीची मागणी करत हौद्यात धाव घेतली.

सदस्यांनी आपापल्या जागी परत जावं असं सभापती ओम बिरला यांनी वारंवार सांगूनही हे सदस्य हौद्यातूनच घोषणा देत राहिले. गोंधळामुळे कामकाज चालवणं अशक्य झालं तेव्हा सभागृहाचं कामकाज सुरुवातीला २ वाजेपर्यंत आणि नंतर दिवसभरासाठी स्थगित झालं.

राज्यसभेत अनेक सदस्यांनी स्थगन प्रस्तावाची नोटीस दिली होती. भारतीय आयुर्विमा महामंडळ, आणि सार्वजनिक क्षेत्रातल्या बँकांनी पैसा गुंतवलेल्या कंपन्यांचे समभाग बाजारात कोसळत असल्याबद्दल चर्चेची मागणी करणारा हा स्थगन प्रस्ताव होता. हा प्रस्ताव योग्य पद्धतीने मांडला नसल्याचं कारण देऊन अध्यक्ष जगदीप धनखड यांनी तो फेटाळून लावला. तेव्हा काँग्रेस, तृणमूल काँग्रेस, द्रमुक, आप, समाजवादी पार्टी आणि इतर विरोधी पक्ष सदस्यांनी गदारोळ सुरु केला. अध्यक्षांनी सदस्यांना शांतता राखायला सांगितलं. मात्र घोषणाबाजी चालूच राहिल्याने सभागृहाचं कामकाज सुरुवातीला दुपारी दोन वाजेपर्यंत आणि नंतर दिवसभरासाठी तहकूब करावं लागलं.

**<><><><><>**

देशाच्या ग्रामीण भागातल्या ११ कोटी ५ लाखापेक्षा जास्त घरांमधे नळाने पाणीपुरवठा होत असल्याची माहिती केंद्रीय जलशक्ती राज्यमंत्री प्रल्हादसिंह पटेल यांनी दिली आहे. लोकसभेत आज एका प्रश्नाच्या लेखी उत्तरात त्यांनी सांगितलं की जल जीवन मिशन सुरु होण्यापूर्वी ग्रामीण भागातल्या ३ कोटी २३ लाख घरांमधे नळाने पाणीपुरवठा होत होता. त्यात आता ७ कोटी ८१ लाख पेक्षा जास्त घरांची भर पडली असून या मिशनच्या माध्यमातून २०२४ पर्यंत ग्रामीण भागातल्या सर्व घरांमधे नळाने पाणीपुरवठा होईल.

आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र रात्री ८.०० वाजता

२ फेब्रुवारी २०२३ – गुरुवार

<><><><><>

दे◌ेशातली हवाई वाहतूक कोरोना पूर्व काळाच्या तुलनेत ९७ टक्क्यांवर पोहोचली आहे. केंद्रीय हवाई वाहतूक राज्यमंत्री राज्यमंत्री डॉक्टर वी. के. सिंह यांनी लोकसभेत एका उत्तरात ही माहिती दिली.

२०१४-१५ ते २०१९-२० दरम्यान देशांतर्गत वाहतुकीत साडे चौदा टक्के वाढ झाली होती. त्यानंतर कोरोनामुळं २ वर्ष प्रवाशी संख्येत घट झाली.

<><><><><>

केंद्रीय युवक व्यवहार आणि क्रीडा मंत्रालयासाठीची तरतूद यंदाच्या अर्थसंकल्पात गेल्यावर्षीच्या तुलनेत ११ टक्क्यांनी वाढली आहे. २०१०मधे देशात राष्ट्रकुल क्रीडास्पर्धा झाल्या होत्या, त्यानंतर प्रथमच एवढी मोठी आर्थिक तरतूद या विभागासाठी झाली आहे. २०२३-२४ या वर्षासाठी ३ हजार ३९७ कोटी रुपयांची तरतूद युवा आणि क्रीडाविभागाला मिळाल्याबद्दल मंत्री अनुराग ठाकूर यांनी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचे आभार मानले आहेत. तळागाळातल्या सध्याच्या क्रीडाव्यवस्थेत आमूलाग्र बदल करण्याची गरज ओळखून सरकार तळागाळापर्यंत पोहोचून गुणवत्ता हुडकून काढून पायाभूत सुविधा पुरवत आहे. असं ठाकूर यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

रेल्वेच्या प्रवासी विभागानं जानेवारीपर्यंत महसुलात ७३ टक्क्यांची वाढ नोंदवली आहे. रेल्वेची एप्रिल ते जानेवारी २०२३ या कालावधीत प्रवासी विभागातील एकूण कमाई ५४ हजार ७३३ कोटी रुपये आहे. मागील वर्षी याच कालावधीत ६ हजार १८१ लाख प्रवाशांच्या तुलनेत याच कालावधीत एकूण अंदाजे

६ हजार ५९० लाख प्रवाशांनी आरक्षण केलं असल्याचं रेल्वे मंत्रालयानं सांगितलं. अनारक्षित प्रवासी विभागाचे उत्पन्न ११ हजार ७८८ कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे, जे गेल्या वर्षीच्या २ हजार ५५५ कोटी रुपयांच्या तुलनेत ३६१ टक्क्यांनी वाढलं असल्याचं मंत्रालयानं सांगितलं.

<><><><>

पोलीस संस्थांमध्ये आंतराष्ट्रीय परस्पर सहकार्य वाढवण्याची आवश्यकता असल्याचं केंद्रीय अन्वेषण ब्युरोचे संचालक सुबोध कुमार जैस्वाल यांनी म्हटलं आहे. ते इंटरपोल यंग ग्लोबल पोलिस लीडर्स कार्यक्रमला मुंबईत संबोधित करत होते. तिसरा इंटरपोल यंग ग्लोबल पोलिस लीडर्स कार्यक्रम आज संपन्न झाला. या कार्यक्रमाचं आयोजन २५ जानेवारी पासून आजपर्यंत दिल्ली, मुंबई आणि गुजरात मध्ये करण्यात आलं होत. ४४ देशांतील ५९ अधिकाऱ्यांनी या शिबिराला हजेरी लावली होती.

<><><><>

महाराष्ट्र विधान परिषदेच्या पाच जागांसाठी झालेल्या निवडणुकीत कोकणची जागा भाजपानं जिंकली असून तीन ठिकाणी महाविकास आघाडीचे उमेदवार आघाडीवर आहेत. नाशिकमधे महाविकास आघाडी पुरस्कृत उमेदवार पिछाडीवर आहे.

**कोकण** विभाग शिक्षक मतदारसंघात भाजपाचे उमेदवार ज्ञानेश्वर म्हात्रे पहिल्या पसंतीच्या क्रमानुसार विजयी झाले आहेत. या निवडणुकीत ३५ हजार ६९ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. त्यापैकी १ हजार ६१९ मते बाद झाल्यानं ३३ हजार ४५० मतं वैध ठरली. विजयासाठी पहिल्या पसंतीची १६ हजार ७२६

मतं आवश्यक होती. म्हात्रे यांना २० हजार ६४८ मतं मिळाल्यानं ते विजयी झाले. विद्यमान आमदार आणि महाविकास आघाडीचे उमेदवार बाळाराम पाटील यांना १० हजार ९९७ मतं मिळाली. या विजयाबद्दल उद्योग मंत्री उदय सामंत यांनी ज्ञानेश्वर म्हात्रे यांचं अभिनंदन केलं आहे. हा विजय म्हणजे शिंदे-फडनवीस सरकारवर कोकणवासियांनी दाखवलेला विश्वास असल्याचं सामंत यांनी म्हटलं आहे.

**अमरावती** विभाग पदवीधर मतदारसंघात मतमोजणीच्या दुसऱ्या फेरीतही महाविकास आघाडीचे उमेदवार धीरज लिंगाडे १ हजार ६०० मतांनी पुढं होते.

नागपूर विभाग शिक्षक मतदार संघात एकूण ३४ हजार ३६० मत पत्रिकांच्या दोन्ही फेऱ्यांची मतमोजणी पूर्ण झाली. त्यात काँग्रेस पुरस्कृत सुधाकर अडबाले यांना पहिल्या पसंतीची १६ हजार ७०० मतं मिळाली आहेत. आवश्यक मतांचा कोटा १६ हजार ४७३ ठरवण्यात आला होता. भाजपा पुरस्कृत नागो गाणार यांना ८ हजार २११ मतं मिळाली.

**नाशिक** विभाग पदवीधर मतदारसंघात एकूण ५० हजार ५५५ वैध मतांपेकी अपक्ष उमेदवार सत्यजित सुधीर तांबे यांना ३१ हजार ९ मतं मिळाली आहेत. महाविकास आघाडी पुरस्कृत शुभांगी भास्कर पाटील यांना १६ हजार ३१६ मतं मिळाली.

**औरंगाबाद** विभाग शिक्षक मतदार संघ निवडणुकीच्या मतमोजणीच्या पहिल्या पसंतीच्या मतांमध्ये महाविकास आघाडीचे उमेदवार विक्रम काळे २० हजार ७८ मत घेऊन आघाडीवर आहेत. अपक्ष उमेदवार सूर्यकांत संग्राम विश्वासराव हे १३ हजार ५४३ मतं घेऊन दुसऱ्या क्रमांकावर आहेत. तर भारतीय जनता पक्षाचे उमेदवार किरण पाटील यांना १३ हजार ४८९ मतं मिळाली आहेत.

<><><><><>

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे अर्थमंत्री म्हणून प्रथमच राज्याचा २०२३ चा अर्थसंकल्प सादर करणार आहेत. या अर्थसंकल्पासाठी त्यांनी महाराष्ट्रातील जनतेकडून काही अभिनव संकल्पना मागवल्या आहेत. या सूचना नागरिकांना bit.ly/MahaBudget२३ संकेतस्थळावर पाठवता येतील.

<><><><><>

अकृषी विद्यापीठ आणि महाविद्यालयीन शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या परीक्षेच्या कामकाजावरील बहिष्काराच्या आंदोलनामुळे मुंबई विद्यापीठाच्या उद्या पासूनच्या सर्व परीक्षा स्थगित करण्यात आल्या आहेत. स्थगित केलेल्या सर्व परीक्षेचे सुधारित वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यात येईल, असे विद्यापीठाचे परीक्षा आणि मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. प्रसाद कारंडे यांनी सांगितले.

विविध विद्याशाखेच्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा विविध केंद्रावर सुरू आहेत. आज मुंबई विद्यापीठाच्या १० परीक्षा सुरळीत पार पडल्या आहेत असं विद्यापीठं स्पष्ट केलं आहे.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठानंही उद्या आणि परवाच्या सर्व विषयांच्या परीक्षा रद्द केल्या आहे. रद्द करण्यात आलेल्या परीक्षांचे वेळापत्रक यथावकाश जाहीर करण्यात येईल, असं परीक्षा आणि मूल्यमापन मंडळानं कळवलं आहे.

<><><><><>

नागालँडमधल्या विधानसभा निवडणूक यंदा ३ महिला उमेदवार रिंगणात असणार आहेत. नॅशनलिस्ट डेमोक्रेटिक प्रोग्रेसिव्ह पार्टीनं २ आणि भाजपानं एका

महिलेला उमेदवारी जाहीर केली आहे. या राज्यात राजकारण हे पुरुष प्रधान असल्यानं विधीमंडळात महिलांना संधी मिळाली नव्हती.

त्रिपुरा विधानसभेच्या ६० जागांसाठी २५९ उमेदवार रिंगणात आहेत. अर्ज घेण्याचा आज शेवटचा दिवस होता. त्यानंतर ही परिस्थिती स्पष्ट झाल्याचं मुख्य निवडणूक अधिकारी किरण गित्ते यांनी सांगितलं. येत्या १६ तारखेला त्रिपुरात मतदान होणार आहे.

<><><><><>

केंद्रीय बंदरे, जहाजबांधणी, जलमार्ग आणि आयुष मंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी जी-२० सदस्य देशांच्या प्रतिनिधींना शाश्वत जीवनशैलीला व्यापक स्वरूप देण्यासाठी एकत्रितपणे कार्य करण्याचं आवाहन केलं. आज सकाळी गुवाहाटी इथं जी-२० च्या पहिल्या शाश्वत वित्तीय कार्यगटाच्या बैठकीच्या उद्घाटनाच्या वेळी ते बोलत होते. जगानं स्वच्छ आणि हरित समाजासाठी काम केलं पाहिजे असं सांगताना, कार्बन फूट प्रिंट्स कमी करण्याचही आवाहन त्यांनी केलं. भारतानं आपल्या राष्ट्रीय विकासासाठी शाश्वत विकासाचा अवलंब केला असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली. या दोन दिवसीय बैठकीत आम्ही हवामान कृतीसाठी शाश्वत वित्तपुरवठा आणि जगभरातल्या लोकांच्या कल्याणासाठी आणि समान विकासासाठीच्या अडचणी ओळखण्याचा प्रयत्न करू, आणि या उदात्त कृतीसाठी शाश्वत वित्त कसं जमवायचं याचा रोडमॅप या जी-२० संमेलनातून समोर येईल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

जी-२० चे सदस्य देश, अतिथी देश आणि विविध आंतरराष्ट्रीय संस्थांचे १०० हून अधिक प्रतिनिधी या बैठकीला उपस्थित आहेत. दोन दिवसीय बैठकीत

हवामानविषयक कृतीसाठी मुबलक संसाधनांची जमवाजमव करण्याच्या मुद्द्यांवर चर्चा करण्यासाठी चार सत्रे होणार आहेत.

<><><><><>

जम्मू काश्मीरमधे नरवाल इथं २१ जानेवारीला झालेल्या स्फोटांप्रकरणी पोलिसांनी लष्कर – ए- तोयबाच्या एका अतिरेक्याला अटक केली आहे. आरिफ अहमद असं त्याचं नाव असून तो सरकारी कर्मचारी आहे. जम्मू काश्मीरचे पोलीस महासंचालक दिलबाग सिंग यानी सांगितलं की, त्याच्या जवळून नवीन प्रकारच्या स्फोटकाविषयी महत्त्वाचे धागेदोरे हाती आले आहेत. सुगंधी परफ्यूमच्या बाटलीसारख्या बाटलीत आयईडी हे शक्तिशाली स्फोटक भरलेलं असतं, असं त्यांनी सांगितलं. या स्फोटकाच्या घातकतेची तपासणी अद्याप सुरु असल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

ऑस्ट्रेलियामध्ये खलिस्तानी अतिरेक्यांनी केलेल्या हल्ल्याचा भारतानं निषेध केला आहे. स्थानिक प्राधिकाऱ्यांनी याप्रकरणी तपास करुन दोषींना शिक्षा करावी अशी मागणी भारतानं केल्याचं परराष्ट्र मंत्रालयचे प्रवक्ते अरिंदम बागची यांनी म्हटलं आहे. भारतीय नागरिकांची आणि त्यांच्या मालमत्तेच्या सुरक्षेची काळजी घ्यावी अशी विनंती ऑस्ट्रेलियाला केली असल्याचंही ते म्हणाले.

<><><><><>

तिरंगी टी ट्वेंटी महिला क्रिकेट मालिकेत आज दक्षिण अफ्रिकेत ईस्ट लंडनमधे बफेलो पार्क इथं सुरु असलेल्या अंतिम सामन्यात भारतानं दक्षिण आफ्रिकेपुढं विजयासाठी ११० धावांचं आव्हान ठेवलं आहे.

भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला. हरलीन देओलच्या ४६ धावांच्या खेळीमुळे भारताला निर्धारित २० षटकात ४ गडी गमावून १०९ धावा करता आल्या. कर्णधार हरमनप्रीत कौरनं २१, दिप्ती शर्मानं नाबाद १६ तर जेमिमा रॉड्रिग्जनं ११ धावा केल्या.

वेस्ट इंडीज हा या तिरंगी मालिकेतला तिसरा देश आहे.

<><><><><>

श्रीलंकेच्या ७५ व्या स्वातंत्र्यदिन सोहळ्यात भारताचे परराष्ट्र राज्यमंत्री व्ही. मुरलीधरन सहभागी होणार आहेत. यासाठी उद्या ते रवाना होणार आहेत. यावेळी श्रीलंकेचे राष्ट्रपती आणि परराष्ट्र मंत्र्यांसोबत ते द्वीपक्षीय चर्चा करतील. नेपाळच्या परराष्ट्रमंत्री विमला राय पौड्याल देखील या कार्यक्रमात सहभागी होणार आहेत.

<><><><><>

सिस्टीम फॉर पेन्शन ॲडमिनिस्ट्रेशन अर्थात स्पर्शद्वारे निवृतीवेतन घेणाऱ्या सर्व संरक्षण निवृत्ती वेतनधारकांना सरकारनं या महिन्याच्या २० तारखेपर्यंत वार्षिक ओळख प्रक्रिया पूर्ण करायला सांगितलं आहे. मासिक निवृत्तिवेतन सतत आणि वेळेवर खात्यात जमा होण्यासाठी वार्षिक ओळख किंवा जीवन प्रमाणपत्र पूर्ण करणे ही एक वैधानिक आवश्यकता असल्याचं संरक्षण मंत्रालयानं म्हटलं आहे.

<><><><><>

खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेत भोपाळमधे झालेल्या नेमबाजी स्पर्धेत महाराष्ट्राच्या ईशा टाकसाळेनं मुलींच्या दहा मीटर रायफल प्रकारात रौप्यपदक, तर स्वराज भोंडवेनं मुलांच्या २५ मीटर पिस्तूल रॅपिड फायर प्रकारात कांस्यपदक पटकावलं.

टेबल टेनिसमध्ये महाराष्ट्राच्या तनिषा कोटेचानं मुलींच्या एकेरीत अंतिम फेरी गाठत, पदक निश्चित केलं आहे. इंदूरमधे आज झालेल्या उपांत्य फेरीतल्या चुरशीच्या लढतीत तनिषानं हरियाणाच्या प्रिथोकी चक्रवर्तीचा ४-३ असा पराभव केला. चक्रवर्तीनं उपांत्यपूर्व फेरीत महाराष्ट्राच्या पृथा वर्टीकरचं आव्हान संपुष्टात आणलं. एकेरीच्या अंतिम फेरीत तनिषाची लढत दिल्लीच्या लक्षिता नारंगशी होणार आहे. तनिषानं याआधी या स्पर्धेतल्या दुहेरीत रिशा मीरचंदानी हिच्या साथीनं रौप्य पदक पटकावलं आहे.

मुलांच्या उपांत्य फेरीत महाराष्ट्राच्या मोदी याला उत्तर प्रदेशाच्या दिव्यांश श्रीवास्तवनं पराभूत केलं. मात्र मोदी याला कांस्यपदकासाठी खेळण्याची अजूनही संधी आहे.

जिम्नॅस्टिक्समध्ये महाराष्ट्राच्या सारा राऊळ आणि रिया केळकर, तसंच मुलांमध्ये आर्यन दवंडे आणि मानस मनकवळे यांनी वैयक्तिक सर्वसाधारण विभागात अंतिम फेरीकडे आगेकूच केली.

आर्यननं प्राथमिक फेरीत पहिलं स्थान घेताना ६९ पूर्णांक ७ दशांश गुणांची कमाई केली. तर, मानस चौथ्या स्थानावर असून त्याचे ६६ पूर्णांक ६ दशांश गुण झाले आहेत. मुलींमध्ये सारानं ४० पूर्णांक ४ दशांश गुणांसह दुसरं स्थान मिळवलं, तर तिसऱ्या स्थानावर असलेल्या रियानं ४० पूर्णांक २ दशांश गुण घेतले आहेत.

मुष्टीयुद्ध स्पर्धेत महाराष्ट्राच्या अन्वर शेख आणि उस्मान अन्सारी यांनी उपांत्य फेरी धडक मारत दोन पदकं निश्चित केली.

बास्केटबॉलमधे, सलग दोन पराभवामुळे आव्हान संपुष्टात आलेल्या महाराष्ट्राच्या मुलींनी अखेरच्या साखळी सामन्यात राजस्थानवर ८९-५८ असा विजय मिळवला. महाराष्ट्राच्या विजयात पुन्हा एकदा अनन्या भावसार हिनं

सर्वाधिक गुणांची नोंद केली. तिनं आज ३३ गुण नोंदवले. तिला गुंजन मंत्रीने १७ आणि भूमिका सर्जेनं १६ गुण नोंदवत सुरेख साथ केली.

बॅडमिंटनमध्ये महाराष्ट्राच्या नाईशा कौरनं अवघ्या ३५ मिनिटात पाचव्या अंतिम फेरी गाठली. तिनं गटातल्या महिला एकेरीच्या उपांत्य सामन्यात गार्गीचा पराभव करत पदार्पणातच पदकाची संधी मिळवली आहे.

//<><><><><>//